साहित्यिक, कार्यकर्त्यांनी वैचारिक दडपशाही झुगारावी
सकाळ वृत्तसेवा (Saturday, February 06, 2010 )

पुणे – मराठी साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी वैचारिक दडपशाहीला बळी न पडता समाजातील नवीन प्रवाहांशी जुळवून घेतले पाहिजे, असे आवाहन मालदीवमधील भारताचे उच्चायुक्त ज्ञानेश्वर मुळे यांनी शुक्रवारी येथे केले.

अमेरिकेतील महाराष्ट्र फाउंडेशन आणि साधना ट्रस्टतर्फे साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील कामगिरीबद्दल दहा जणांचा खास पुरस्कार देऊन बालगंधर्व रंगमंदिरात गौरव करण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अभिनेते नाना पाटेकर, फाउंडेशनच्या अध्यक्षा अरुंधती विनोद, सचिव सुनील देशमुख या वेळी उपस्थित होते. माजी केंद्रीय मंत्री मोहन धारिया यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम झाला.

धुळे जिल्ह्यातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व्यंकटअण्णा रणधीर आणि ज्येष्ठ समीक्षक गो. पु. देशपांडे यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. दोन लाख रुपये आणि सन्मानचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप होते. "लोकसत्ता'चे संपादक कुमार केतकर, प्रा. सुभाष वारे, चंद्रकांत पाटील, लक्ष्मीनारायण बोल्ली, चंद्रशेखर फणसाळकर, बंड्या साने, श्रीनिवास कुलकर्णी, योगिनी खानोलकर यांना सामाजिक व साहित्य क्षेत्रातील पुरस्कार प्रदान करण्यात आले.

मुळे म्हणाले, "संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम या वैश्विक नाते जोडणाऱ्या संतांच्या भूमीत मराठीचा वाद झाल्यास महाराष्ट्राखेरीज इतर भारत कुणाचा, भारताबाहेरील महाराष्ट्रीयन कुणाचे, हा नवीन वाद निर्माण होईल. त्यानंतर मराठी माणूस कोठे गेला याचा शोध घ्यावा लागेल. हिंदवी स्वराज्य स्थापन झालेल्या राज्यात अनेक ब्रिगेड आणि सेना उभ्या राहिल्या आहेत. एके काळी देशाचे नेतृत्व केलेल्या लोकमान्य टिळक, समाजसुधारक आगरकर यांच्या महाराष्ट्राचा सध्या वैचारिक ऱ्हास होत असून सरंजामशाहीचे निकृष्ट रसायन निर्माण होत असल्याने आत्मविश्वास कमी होत आहे. त्यासाठी कोणाचेही अंधानुकरण न करता दडपशाही झुगारून मराठी माणसानेच त्याबाबत अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे.''

नाना पाटेकर म्हणाले, "आनंदवन हे माझ्या माहेरासारखे आहे. बाबा आमटे यांच्यामुळे माझ्यावर सामाजिक कार्याचे संस्कार झाले आहेत. बाबा आमटे यांनी सांगितल्यामुळे मी कलासृष्टीत परत आलो. आतापर्यंत मराठी माणूस म्हणून मी कोणाच्या खांद्यावर हात टाकण्यास घाबरत नव्हतो. आता वातावरण बदलले आहे.'' साहित्य आणि सामाजिक क्षेत्रातील कामगिरीबद्दल गौरव केलेल्या मान्यवरांच्या पुरस्कारांची रक्कम कार्यक्रमात जाहीर करण्यात येऊ नये; कारण त्यांचे समाजातील काम अमूल्य असते, असेही पाटेकर यांनी सांगितले.
देशपांडे म्हणाले, "सध्याच्या सामाजिक परिस्थितीत कृतिशील विचाराचे विश्व तुटक होत चालले आहे. त्यामुळे मराठी माणसातील आत्मविश्वास कमी होऊ लागला आहे. तो वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न हवेत.''

समाजपरिवर्तनासाठी अंधश्रद्धेच्या निर्मूलनाची गरज असून त्यासाठी सामाजिक चळवळीत झोकून

देण्याची गरज रणधीर यांनी प्रतिपादन केली; तर माहिती तंत्रज्ञान आणि दहशतवादामुळे जग झपाट्याने बदलत आहे. हा बदल चांगल्या दिशेने व्हावा, असे केतकर यांनी सांगितले.

धारिया म्हणाले, "महाराष्ट्र फाउंडेशनच्या सहकार्याने व्यंकटअण्णा रणधीर आणि इतर मान्यवरांचे सत्कार करण्याची संधी मिळणे हा साधना ट्रस्टचा गौरव आहे. काही नेत्यांच्या मराठीच्या वादाने महाराष्ट्रीय लोकांचा आत्मविश्वास कमी होणार नाही. सामाजिक परिस्थिती विचारात घेता नवीन विचाराची क्रांती होऊन समाजपरिवर्तनाच्या दिशेने वाटचाल सुरू होईल.''

नरेंद्र दाभोलकर यांनी प्रास्ताविक केले. सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालन केले.

**'षंढत्व' आल्यासारखे वाटते...**

चित्रपटसृष्टीतील कलावंत म्हणून मला हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन सर्वच भूमिका कराव्या लागतात. तेथे मी फक्त मराठी किंवा महाराष्ट्रीय राहू शकत नाही. परंतु सध्या सर्व समाजातील वातावरण विचारात घेता "षंढत्व' आल्यासारखे वाटते. आपण विविध क्षेत्रांतील कामगिरीबद्दल मान्यवरांचे समाजात सत्कार करतो, त्यांचे विचार घेत नाही. समाजातील घटनांबाबत फक्त चर्चा करतो; म्हणून आत्मविश्वास वाढीसाठी समाजपरिवर्तनाची सुरवात स्वत:पासून केली पाहिजे, असे नाना पाटेकर यांनी नमूद केले.